जान -३६५-१२००(२१)

(२)

(13)

बृहन्मुंबई महानगरपालिका

सामान्य प्रशासन विभाग

**परिपत्रक**

क्र.एमओएम/१५४३ दि.२०-१२..२००३

विषय : महाराष्ट्र माहितीचा अधिकार २००२.

संदर्भ : परिपत्रक क्र.एमओएम/६८८३ दि.१९.३.२००३.

महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ च्या वर संदर्भित केलेल्या परिपत्रकास अनुसरुन तसेच दि.११.८.२००३ रोजी महाराष्ट्र शासन राजपत्रात प्रसिध्द केलेला सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१ नुसार बृहन्मुंबई महानगरपालिकेची आवश्यक ती माहिती जनतेला उपलब्ध करुन देण्यासाठी खालील परिच्छेदात नमूद केलेल्या अधिकाऱ्यांची "सार्वजनिक माहिती अधिकारी (बृहन्मुंबई महानगरपालिका)" म्हणून नियुक्ती करण्यात येत आहे .

| क्र. | खाते / विभाग / युनिट | सार्वजनिक माहिती अधिकारी (बृहन्मुंबई महानगरपालिका) |
|---|---|---|
| १. | विभाग कार्यालय | संबंधित सहायक आयुक्त |
| २. | मध्यवर्ती नगर अभियंता खाते | नगर अभियंता |
| ३. | जल अभियंता खाते | जल अभियंता |
| ४. | विकास नियोजन, इमारत प्रस्ताव | प्रमुख अभियंता (विकास नियोजन ) |
| ५. | नागरी प्रशिक्षण आणि संशोधन केंद्र | नगर अभियंता |
| ६. | गालिच्छ वस्ती सुधार विभाग | नगर उप अभियंता (गालिच्छ वस्ती सुधार) |
| ७. | प्रमुख अभियंता (रस्ते) | प्रमुख अभियंता (रस्ते) |
| ८. | प्रमुख अभियंता (यांत्रिकी आणि विद्युत) | प्रमुख अभियंता (यांत्रिकी आणि विद्युत) |
| ९. | प्रमुख अभियंता (पर्जन्य जलवाहिन्या) | प्रमुख अभियंता (पर्जन्य जलवाहिन्या) |
| १०. | प्रमुख अभियंता (पाणी पुरवठा प्रकल्प) | प्रमुख अभियंता (पाणी पुरवठा प्रकल्प) |
| ११. | प्रमुख अभियंता (सामाईक सेवा) | प्रमुख अभियंता (सामाईक सेवा) |
| १२. | प्रमुख अभियंता (मलनि:सारण प्रचालन) | प्रमुख अभियंता (मलनि:सारण प्रचालन) |
| १३. | प्रमुख अभियंता (मलनि:सारण प्रकल्प) | प्रमुख अभियंता (मलनि:सारण प्रकल्प) |
| १४. | मुंबई मलनि:सारण प्रकल्प | प्रमुख अभियंता (मुंबई मलनि:सारण प्रकल्प) |
| १५. | घन कचरा व्यवस्थापन | प्रमुख अभियंता (घन कचरा व्यवस्थापन) |
| १६. | आरोग्य खाते | कार्यकारी आरोग्य अधिकारी |
| १७. | करनिर्धारण व संकलन खाते | करनिर्धारक व संकलक |
| १८. | लेखा विभाग - (कोषागार, वित्त व पा.पु.म.नि.) | संबंधित प्रमुख लेखापाल |
| १९. | सामान्य प्रशासन विभाग | प्रमुख कर्मचारी अधिकारी |
| २०. | शिक्षण विभाग | शिक्षण अधिकारी |
| २१. | उद्यान खाते | उद्यान अधीक्षक |
| २२. | अनुज्ञापन खाते | अनुज्ञापन अधीक्षक |
| २३. | दुकाने व तत्सम संस्था | प्रमुख निरीक्षक (दुकाने व आस्थापना) |

| | | |
|---|---|---|
| २४. | म.न.पा.मुद्रणालय | व्यवस्थापक, म.न.पा.मुद्रणालय |
| २५. | जनसंपर्क खाते | जनसंपर्क अधिकारी |
| २६. | सुरक्षा खाते | प्रमुख सुरक्षा अधिकारी |
| २७. | मुंबई अग्निशमन दल | प्रमुख अग्निशमन अधिकारी |
| २८. | विधी खाते | कायदा अधिकारी |
| २९. | जलतरण तलाव | संबंधित विभागाचे उप आयुक्त |
| ३०. | नाटयगृहे | संबंधित विभागाचे उप आयुक्त |
| ३१. | प्रमुख अधिकारी(चौकशी) | प्रमुख अधिकारी (चौकशी) |
| ३२. | प्रमुख रुग्णालये व महाविद्यालये | संबंधित अधिष्ठाता |
| ३३. | बाजार विभाग | सहायक आयुक्त (बाजार) |
| ३४. | मालमत्ता विभाग | सहायक आयुक्त (मालमत्ता) |
| ३५. | अतिक्रमणे निर्मुलन | संबंधित उप आयुक्त |
| ३६. | मध्यवर्ती भांडार | प्रमुख लेखापाल (भांडार) |
| ३७. | किटक नियंत्रण खाते | किटक नियंत्रण अधिकारी |
| ३९. | देवनार पशुवधगृह | महाव्यवस्थापक, देवनार पशुवधगृह |
| ४०. | म.न.पा.चिटणीस खाते | म.न.पा.उप चिटणीस (आस्थापना) |
| ४१. | महानगरपालिका मुख्य लेखा परीक्षक खाते | महानगरपालिका उप मुख्य लेखा परीक्षक (मुख्यालय) |

सदर अधिकाऱ्यांनी त्यांच्या अखत्यारीत असणाऱ्या बाबींविषयी माहिती देण्याकरीता ' सार्वजनिक माहिती अधिकारी (बृहन्मुंबई महानगरपालिका)' म्हणून निर्णय घेवून कार्यवाही करावी.

संदर्भित परिपत्रकात नमूद केल्याप्रमाणे प्रस्तुत अधिनियमाच्या प्रयोजनासाठी सक्षम प्राधिकारी व अपिलिय अधिकारी खालीलप्रमाणे आहेत :

१. उप आयुक्त (सा.प्र.) - सक्षम प्राधिकारी

२. संबंधित खात्याचे अतिरिक्त आयुक्त - अपिलिय प्राधिकारी

३. महानगरपालिका चिटणीस / महानगरपालिका मुख्य लेखा परीक्षक खात्यांच्याबाबतीत अनुक्रमे महानगरपालिका चिटणीस/मुख्य लेखा परीक्षक हे अपिलिय प्राधिकारी असतील.

परिपत्रक क्र.एमओएम/६८८३ दि.१९.३.२००२ अन्वये दिलेल्या निदेशाच्या अनुषंगाने पुढे (१) जनतेला माहिती मिळण्याच्या अधिकाराबाबत शासन निर्णय क्र.ममाअ/२००३/प्र.क्र.५२/०३/५ दि.३१.७.२००३, (२) सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.३१ (माननीय राष्ट्रपतींची संमती मिळाल्यानंतर महाराष्ट्र शासन राजपत्रात दिनांक ११.८.२००३ रोजी प्रसिध्द केलेला अधिनियम) ची प्रत. तसेच (३) महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम २००२ चे शासन परिपत्रक

(१५)

क्र.ममाअ/२००२/प्र.क्र.१२७/०२/५ दि.१४.८.२००३ ही सहपत्रे माहितीकरिता सोबत जोडलेली आहेत.

यास्तव सर्व खाते प्रमुख/सहायक म.न.पा.आयुक्त यांजकडून अधिसूचनेत दिलेल्या आदेशाची काटेकोरपणे अंमलबजावणी व्हावी याकरिता त्यांनी त्यांच्या खात्यातील/विभागातील सर्व संबंधित अधिकाऱ्यांकडून सदर परिपत्रक नोंद करुन घ्यावे व तद्अनुषंगाने पुढील कार्यवाही करण्यात यावी.

| सही/- | सही/- | सही/- | सही/- |
|---|---|---|---|
| ( अे.सी.गोदळ ) | ( एस.एम.चांदेकर ) | ( सुब्रत रथो ) | ( के.सी.श्रीवास्तव ) |
| प्रमुख कर्मचारी अधिकारी | उप आयुक्त (सा.प्र.) | अतिरिक्त आयुक्त (शहर) | म.न.पा.आयुक्त |

सोबत : शासनाकडून प्रसृत केलेली सहपत्रे:-

१)क्र.ममाअ/२००३/प्र.क्र.५२/०३/५ दि.३१.७.२००३.

२)सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्र.३१.

३)क्र.ममाअ/२००२/प्र.क्र.१२७/०२/५ दि.१४.८.२००३.

प्रत : ———————————————————— (————— जादा प्रतींसह)
यांना माहितीसाठी व योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.

आ अ [signature]
रचना व कार्यपध्दती अधिकारी
(आयुक्तांचे कार्यालय)

USER .0 3C:\MOM\Information act 1.doc

जानि - ३६५

जनतेला माहिती मिळण्याच्या अधिकाराबाबत.

महाराष्ट्र शासन
**सामान्य प्रशासन विभाग**
शासन निर्णय, क्रमांक ममाअ-२००३/प्र.क्र.५२/०३/५,
मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३१ जुलै २००३.

**प्रस्तावना :**

महाराष्ट्र राज्यात माहितीचा अधिकार मिळविण्यासाठी तरतुदी करण्याच्या दृष्टीने राज्य शासनाकडून महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००० (सन २००० चा महा. ३८) हा अधिनियम करण्यात आला व तो दिनांक ११ डिसेंबर २००० पासून महाराष्ट्र राज्यात लागू करण्यात आला होता. उक्त अधिनियमात काही बदल करुन एक सर्वसमावेशक आणि पारदर्शक कायदा महाराष्ट्र माहितीचा अधिकार अध्यादेश, २००२ (सन २००२ चा महा.अध्या.१९) हा दिनांक २३ सप्टेंबर २००२ पासून महाराष्ट्र राज्यात अंमलात आणण्यात आला होता. सदर अध्यादेशाचे विधेयकात रुपांतर करुन सदर विधेयक (सन २००२ चे वि.स.वि.क्र.४९) हे २००३ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात पारित करुन ते राष्ट्रपतींच्या मंजुरीसाठी केंद्र शासनाकडे पाठविलेले आहे, व ते राष्ट्रपतींच्या मान्यतेसाठी प्रलंबित आहे.

दरम्यान संसदेने, माहिती स्वातंत्र्य अधिनियम, २००२ (सन २००३ चा ५) हा उक्त विषयावरील एक विस्तृत व सर्वसमावेशक असणारा कायदा पारित केला व तो कायदा मा.राष्ट्रपतींची दिनांक ६ जानेवारी २००३ रोजी संमती मिळाल्यानंतर केंद्र शासनाने त्यांच्या राजपत्रात दिनांक ७ जानेवारी २००३ रोजी प्रसिध्द केला. परंतु, केंद्र शासनाने उक्त अधिनियम अद्याप अंमलात आणलेला नाही.

वरील परिस्थतीत महाराष्ट्र माहितीचा अधिकार अध्यादेश, २००२ (सन २००२ चा महा. अध्या.क्र.१०), हा आज अस्तित्वात नाही व केंद्र शासनाचा अधिनियमही अद्याप अंमलात आलेला नाही. त्यामुळे जनतेच्या मनात माहितीच्या अधिकाराबाबत संभ्रम निर्माण होऊ नये म्हणून, महाराष्ट्र राज्यातील जनतेला माहिती मिळविण्याचा अधिकार पुढे चालू ठेवण्यासाठी शासनाने पुढीलप्रमाणे निर्णय घेतला आहे.

## शासन निर्णय

भारताच्या संविधनाच्या अनुच्छेद १९ (१) अन्वये नागरिकांना दिलेला मुलभूत अधिकाराचा एक भाग म्हणून सर्वोच्च न्यायालयाने माहितीच्या अधिकारास मान्यता दिलेली आहे. त्यामुळे माहिती देण्याबाबत कायदा अस्तित्वात नसला तरी जनतेला माहिती देणे ही शासनाची भूमिका आहे. या बाबींचा विचार करुन शासन असा निर्णय घेत आहे की, महाराष्ट्र माहितीचा अधिकार अध्यादेश, २००२ (सन २००२ चा क्र.१०) हा ज्या शासकीय विभाग, प्राधिकरणे व इतर संस्थांना लागू होता किंवा उक्त अध्यादेशाद्वारे ज्या शासकीय प्राधिकरणांना जनतेला माहिती पुरविणे बंधनकारक होते त्यांनी, यापुढेही जनतेकडून येणाऱ्या अर्जावर तातडीने कार्यवाही करुन जनतेला कमीत कमी वेळेत योग्य व अनुज्ञेय माहिती सोबत जोडलेल्या जोडपत्राला अनुसरुन (प्रमाणे) उपलब्ध करुन द्यावी. मंत्रालयीन सर्व प्रशासकीय विभागांनी, त्यांच्या अखत्यारीत येणाऱ्या सर्व शासकीय/निम शासकीय कार्यालये, मंडळे, महामंडळे, सार्वजनिक उपक्रम, स्थानिक स्वराज्य संस्था, सहकारी संस्था, इत्यादी यांनी जनतेला योग्य व अनुज्ञेय माहिती तातडीने व प्रभावीपणे देण्याकरिता व्यवस्था करण्याचे आदेश तात्काळ निर्गमित करावेत व त्यानुसार योग्य व परिणामकारक कार्यवाही होत असल्याची खात्री करावी. उक्त कायद्यान्वये कोणत्याही शासकीय प्राधिकरणांनी माहिती अधिकारी म्हणून ज्यांची नियुक्ती केलेली होती, तीच व्यवस्था पुढे चालू ठेवण्यात यावी तसेच ज्या शासकीय प्राधिकरणांनी माहिती अधिकाऱ्यांची नियुक्ती केलेली नसेल त्यांनी माहिती अधिकाऱ्याची तातडीने नियुक्ती करावी. तसेच याकरीता आपल्या विभागातील वरिष्ठ अधिकाऱ्याची अपिल प्राधिकारी म्हणून नियुक्ती करण्यात यावी असे निदेश या शासन निर्णयाद्वारे देण्यात येत आहेत. माहिती देण्यासंबंधी सोबत जोडलेल्या जोडपत्रामधील शर्ती व मर्यादांना अनुसरुन कार्यपध्दतीचा अवलंब करण्यात यावा.

जो अधिकारी किंवा कर्मचारी जनतेला जाणीवपूर्वक माहिती देण्यास टाळाटाळ किंवा दिरंगाई करील, किंवा चुकीची अथवा असंबंध्द माहिती पुरविल तो अधिकारी, त्याला लागू असलेल्या सेवा शर्तीच्या नियमातील तरतुदीनुसार शिस्तभंगाच्या कार्यवाहीस पात्र राहील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

सही/-
( संजीवनी कुट्टी )
शासनाचे सचिव.

प्रति,

१) राज्यपालांचे सचिव,
२) मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३) उपमुख्यमंत्र्यांचे सचिव,
४) सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
५) मुख्य सचिव,
६) शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
* ७) प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्यायशाखा, मुंबई,
* ८) प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
* ९) प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई
* १०) प्रबंधक, लोकायुक्त व उपलोकायुक्त यांचे कार्यालय, मुंबई,
* ११) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
* १२) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन मुंबई,
* १३) सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
१४) सर्व विभागीय आयुक्त,
१५) सर्व जिल्हाधिकारी/जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१६) मुख्य सचिव यांचे उप सचिव,
१७) सर्व मंत्रालयीन विभाग,
१८) मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील सर्व विभाग/कार्यालय प्रमुख,
१९) सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
२०) निवड नस्ती.

* (पत्राने )

अनु: ३६५



(19) २

## जोडपत्र

**माहिती मिळविण्याची कार्यपध्दती**

(१) माहिती मिळवण्याची इच्छा असलेली कोणतीही व्यक्ती **नमुना पत्र 'अ'** प्रमाणे संबंधित शासकीय माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज करील.

(२) माहिती मिळण्याची विनंती करणारा अर्ज मिळाल्यानंतर, शासकीय माहिती अधिकारी, शक्य तितक्या शीघ्रतेने आणि कोणत्याही परिस्थितीत, तो अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून पंधरा कामाच्या दिवसांपेक्षा अधिक नसेल एवढ्या कालावधीत, एकतर मागितलेली माहिती पुरवील किंवा माहिती पुरविणे शक्य नसल्यास, माहितीची मागणी फेटाळील.

(३) या प्रकरणी अर्जदारास माहिती उपलब्ध करून देणे शक्य असेल, तथापि, अशी माहिती विविध ठिकाणांवरून संकलित करून द्यावयाची असेल व त्यास १५ कामाच्या दिवसांपेक्षा जास्त कालावधी लागण्याची शक्यता असेल अशा प्रकरणी माहिती उपलब्ध करून देण्यास लागणा-या अपेक्षित कालावधीची माहिती माहिती अधिकाऱ्याने अर्जदारास १५ दिवसांच्या आत द्यावी.

(४) माहिती अधिका-याकडून अर्जदारास १५ कामाच्या दिवसांच्या आत काहीही कळविण्यात आले नसल्यास माहिती अधिकाऱ्याकडून अर्जदारास माहिती देण्याची टाळाटाळ किंवा दिरंगाई करण्यात आल्याचे समजण्यात येईल.

(५) जेव्हा एखादी मागणी फेटाळण्यात येईल तेव्हा त्या बाबतीत, शासकीय माहिती अधिकारी, मागणी करणाऱ्या व्यक्तीस,-

(एक) मागणी फेटाळण्यामागील कारणे ;

(दोन) मागणी फेटाळण्याविरूद्ध ज्या कालावधीत अपील दाखल करता येईल, तो कालावधी ; आणि

(तीन) ज्याच्याकडे अर्जदाराने अपील दाखल करावयाचे तो अधिकारी किंवा प्राधिकारी, या गोष्टी लेखी कळवील.

(६) शासकीय माहिती अधिकाऱ्याच्या आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस **नमुना पत्र 'क'** प्रमाणे साध्या कागदावर आदेशाच्या प्रतीसह संबंधित अपील प्राधिकाऱ्याकडे अपील करता येईल.

(७) अपील प्राधिकारी, अपीलकाराला व संबंधित माहिती अधिकाऱ्याला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, त्यास योग्य वाटेल असा आदेश देईल. अपील प्राधिकाऱ्याचा आदेश अंतिम असेल.

(८) अपील प्राधिका-याकडे प्राप्त झालेल्या अपीलावर अपिल प्राधिकरणाने ३० कामाच्या दिवसांच्या आत निर्णय घेणे आवश्यक आहे.

(९) अपील प्राधिका-याने दिलेला प्रत्येक आदेश संबंधित अपीलकाराला कळविण्यात येईल आणि ज्याच्या आदेशाविरूद्ध अपील दाखल केले होते अशा शासकीय माहिती अधिकाऱ्यालादेखील कळविण्यात येईल.

(१०) शासकीय प्राधिकरणाने ज्या भाषेमध्ये व ज्या नमुन्यामध्ये माहिती ठेवली असेल, त्या भाषेमध्ये व त्या नमुन्यामध्ये माहिती देण्यात येईल.

(११) जेव्हा जेव्हा व जेथे जेथे, मागणी केलेली माहिती ही, एखाद्या व्यक्तीचे जीवन व स्वातंत्र्य यांच्याशी संबंधित असेल तेव्हा तेव्हा व तेथे तेथे, ती माहिती, खालील अनुक्रमांक (१६) मधील अटींच्या अधीन राहून अर्ज मिळाल्यापासून चोवीस तासांच्या आत त्या अर्जदारास पुरविण्यात येईल.

(१२) शासकीय माहिती अधिकारी, अर्जदाराला, माहिती पुरविण्याकरिता अर्जदाराने या शासन निर्णयाला जोडलेल्या **अनुसूचीनुसार** चुकती करावयाची रक्कम आणि ज्या दिनांकापर्यन्त त्याने ती रक्कम चुकती करावयाची व माहिती घेऊन जावयाची तो दिनांक **नमुना पत्र 'ब'** प्रमाणे कळवील.

(१३) अर्जदार, शासकीय माहिती अधिकाऱ्याने सांगितलेली आवश्यक ती फी एकतर मनीऑर्डरने किंवा संबंधित शासकीय माहिती अधिका-यांच्या कार्यालयात रोखीने चुकती करील किंवा कोषागारात भरील.

(१४) शासकीय माहिती अधिकारी अर्जदाराकडून मिळालेली फीची रक्कम "क्र. ००७०-इतर प्रशासनिक सेवा, ६०, इतर सेवा, ८००, इतर जमा रकमा, (१८) माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)" या अर्थसंकल्पीय लेखाशीर्षाखाली जमा करील.

(१५) फी ची रक्कम मिळाल्यावर किंवा कोषागारात फी चुकती केल्याच्या चलनाची प्रत मिळाल्यावर शासकीय माहिती अधिकारी ताबडतोब अर्जदाराला, व्यक्तिशः अथवा टपालाने माहिती पुरवील.

(१६) **माहिती उघड करण्यातून सूट.—कोणत्याही व्यक्तीस,—**

(क) जी माहिती उघड केल्यामुळे भारताचे सार्वभौमत्व व एकात्मता, राज्याची सुरक्षितता किंवा हित, विदेशी राज्याशी असलेले संबंध यांवर बाधकरित्या परिणामक होईल किंवा एखाद्या अपराधास चिथावणी मिळेल, अशी माहिती देण्यात येणार नाही.

(ख) जी माहिती प्रसिद्ध करण्यास कोणत्याही न्यायालयाकडून किंवा न्यायाधिकरणाकडून स्पष्टपणे मनाई करण्यात आली असेल किंवा जी उघड केल्याने न्यायालयाचा अवमान होत असेल, अशी माहिती देण्यात येणार नाही ;

(ग) जी माहिती उघड केल्याने, संसदेच्या अथवा राज्य विधानमंडळाच्या विशेषाधिकारांचा भंग होत असेल, अशी माहिती देण्यात येणार नाही ;

(घ) वाणिज्य क्षेत्रातील विश्वास, व्यापारविषयक गुपिते किंवा बौध्दिक संपदा यांसारखी जी माहिती, उघड केल्याने त्रयस्थ पक्षाच्या स्पर्धात्मक स्थानाला हानी पोहोचेल ती माहिती उघड केल्याने अधिकाधिक लोकहिताची हमी मिळेल, अशी सक्षम प्राधिकाऱ्याची खात्री पटलेली असल्याखेरीज, अशी माहिती देण्यात येणार नाही ;

(ङ) एखाद्या व्यक्तीच्या विश्वासाश्रित संबंधामुळे त्याला उपलब्ध झालेली माहिती - जी माहिती उघड केल्याने अधिकाधिक लोकहिताची हमी मिळेल, अशी सक्षम प्राधिकाऱ्याची खात्री पटलेली असल्याखेरीज - देण्यात येणार नाही ;

(च) एखाद्या व्यक्तीच्या सेवा अभिलेखाशी संबंधित असलेली माहिती देण्यात येणार नाही ;

(छ) विदेशी सरकार किंवा आंतरराष्ट्रीय संघटना यांच्याकडून गुप्तपणे मिळालेली माहिती देण्यात येणार नाही;

(ज) जी माहिती उघड केल्याने, कोणत्याही व्यक्तीचे जीवन किंवा शारिरिक सुरक्षितता धोक्यात येईल अथवा कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी किंवा सुरक्षिततेच्या प्रयोजनांसाठी गुप्तपणे दिलेल्या माहितीचे सूत्र किंवा केलेले सहाय्य ओळखता येईल, अशी माहिती देण्यात येणार नाही ;

(झ) शासकीय गुपिते अधिनियम, १९२३ च्या तरतुदीन्वये जी उघड करण्यास मनाई केली आहे, अशी माहिती देण्यात येणार नाही ;

(ञ) ज्यामुळे गुन्हेगारांचे अन्वेषण करणे किंवा त्यांना अटक करणे किंवा त्यांच्यावर खटला दाखल करणे यामध्ये अडथळा येईल, अशी माहिती देण्यात येणार नाही; आणि

(ट) जी माहिती उघड करण्याचा कोणत्याही सार्वजनिक कामकाजाशी किंवा हितसंबंधाशी कोणताही संबंध नसेल किंवा जी उघड केल्याने व्यक्तीच्या खाजगीपणाचे विनाकारण उल्लंघन होईल अशी वैयक्तिक माहितीशी संबंधित असलेली माहिती, व्यापक लोकहिताच्या दृष्टीने ती उघड करणे आवश्यक आहे, अशी सक्षम प्राधिका-याची खात्री पटलेली असल्याखेरीज देण्यात येणार नाही.

(१७) **विवक्षित प्रकरणांमध्ये माहिती देण्यास नकार देण्याची कारणे.—**शासकीय माहिती अधिकाऱ्यास पुढील बाबतीत माहिती पुरविण्याच्या विनंतीस, नकार देता येईल :—

(क) जेव्हा माहिती ही आधीच **राजपत्रात** किंवा अन्यत्र प्रसिद्ध झालेली असून ती जनतेला उपलब्ध आहे किंवा ती अशा स्वरूपाची आहे की परत मिळविणे किंवा संस्करण करणे आवश्यक असलेल्या त्या मोठ्या प्रमाणातील माहितीसाठी शासकीय प्राधिकारणाच्या साधनसामग्रीचा प्रमाणाबाहेर वापर करावा लागेल

परंतु, उपरोक्त कारणावरून जेव्हा अशी विनंती नाकारली असेल तेव्हा, माहिती मागणाऱ्या व्यक्तीला, ज्यायोगे माहितीचा पुरवठा करणे सुकर होईल अशा रीतीने ती विनंती पुन्हा सादर करण्यास शक्य होईल तितकी मदत करणे हे शासकीय माहिती अधिका-याचे कर्तव्य असेल ;

(ख) जेव्हा ती माहिती अशा माहितीशी संबंधित असेल की, जी कायदा, नियम, विनियम किंवा आदेश याद्वारे विशिष्ट वेळी प्रसिद्ध करणे आवश्यक असेल.

(१८) ज्या माहितीसाठी एखादी विनंती करण्यांत आली असेल ती माहिती, जर वरील परिच्छेद १६ अन्वये उघड करण्यापासून सूट दिली आहे अशा माहितीचा समावेश नसलेल्या अभिलेखाच्या भागामधून देणे शक्य असेल किंवा ती माहिती जर, सूट दिलेल्या माहितीचा समावेश असलेल्या अभिलेखाच्या कोणत्याही भागापासून वाजवीरित्या पृथक करता येण्याजोगी असेल तर, ती माहिती उघड करण्यापासून सूट दिलेल्या एखाद्या माहितीशी किंवा अभिलेखाशी संबंधित आहे, या कारणावरून ती विनंती पूर्णपणे नाकारता येणार नाही.

(१९) **नोंदवही ठेवणे.—**प्रत्येक शासकीय माहिती अधिकारी प्राप्त झालेल्या अर्जावर त्यांनी केलेल्या कार्यवाहीच्या तपशीलाची नोंद करण्यासाठी **नमुनापत्र 'ड'** मध्ये दिलेल्या नमुन्यात नोंदवही ठेवील.

जन - ३६५



21

नमुनापत्र - अ

[ पहा - (१) ]

**माहिती मिळविण्याकरीता करावयाच्या अर्जाचा नमुना**

**प्रति,**

**शासकीय माहिती अधिकारी,**
**(कार्यालयाचे नाव व पत्ता)**

(१) अर्जदाराचे संपूर्ण नाव :

(२) पत्ता :

(३) आवश्यक असलेल्या माहितीचा तपशील :

(एक) माहितीचा विषय :

(दोन) माहितीशी संबंधित कालावधी :

(तीन) आवश्यक असलेल्या माहितीचे वर्णन :

(चार) माहिती टपालाव्दारे किंवा व्यक्तिशः आवश्यक आहे किंवा कसे :
(प्रत्यक्ष टपाल खर्च अतिरिक्त शुल्कामध्ये समाविष्ट केला जाईल)

(पाच) टपालाद्वारे असेल त्याबाबतीत :
(सर्वसाधारण, नोंदणीकृत किंवा शीघ्र)

(सहा) ज्यासाठी माहिती आवश्यक आहे ते प्रयोजन :

ठिकाण : ..................

दिनांक : ..................

अर्जदाराची स्वाक्षरी

विषयाचा स्थूल प्रवर्ग दर्शविण्यात यावा (शासकीय जमीन देणे/सेवा बाबी/परवाने इत्यादी) ज्या कालावधीसंबंधातील माहिती आवश्यक आहे तो कालावधी दर्शविणे. माहितीचा विशेष तपशील दर्शविणे आवश्यक आहे.

नमुनापत्र - ब
[ पहा - (१२) ]

प्रेषक ................................................
माहिती अधिकाऱ्याचे पदनाम

प्रति,
(अर्जदाराचे नाव)
अर्जदाराचा पत्ता

महोदय,

.................................. यासंबंधीची माहिती मागविण्यासाठी खाली सही करणाऱ्याला संबोधून आपण पाठवलेल्या ..................... ............................... दिनांकाच्या अर्जाच्या संदर्भात, आपल्याला पुरविण्यासाठी वरील माहिती तयार आहे. आपणांस ही माहिती पुरविण्यासाठी अतिरिक्त शुल्क रु. .............................. इतके आहे.

आपणांस विनंती करण्यात येत आहे की, हे शुल्क आपण या कार्यालयाकडे प्रदान करावे किंवा मनिऑर्डर पाठवावी किंवा शासकीय कोषागारात भरणा करावा आणि या कार्यालयास चलनाची एक प्रत पाठवावी आणि माहिती घेऊन जावी.

ही शुल्काची रक्कम, अर्थसंकल्पीय शीर्ष क्र. "००७०, इतर प्रशासनिक सेवा, ६०-इतर सेवा, ८००-इतर जमा रकमा, (१८)-माहितीचा अधिकार (००७०-०१६-१)"

कृपया ................................................. दिनांक किंवा तत्पूर्वी प्रदान करावे.

शासकीय माहिती अधिकारी.

जनी - ३६५



(23)

नमूनापत्र - क

[ पहा - (६) ]

**अपील करावयाच्या अर्जाचा नमूना**

प्रेषक,

........................................................................................

(अर्जदाराचे नाव आणि पत्ता)

प्रति, ........................................................................................

(अपील प्राधिकाऱ्याचे नाव/पदनाम/पत्ता)

(१) अपीलकाराचे संपूर्ण नाव :

(२) पत्ता :

(३) माहिती अधिकाऱ्याचा तपशील :

(४) ज्या आदेशाच्या विरुध्द केले आहे तो अपील आदेश मिळाल्याचा दिनांक :

(५) अपील दाखल करण्याचा अंतिम दिनांक :

(६) माहितीचां तपशील :

(एक) आवश्यक असलेल्या माहितीचे स्वरूप आणि विषय

(दोन) ज्या कार्यालयाशी किंवा विभागाशी संबंधित माहिती आहे त्याचे नाव

(तीन) ज्यासाठी माहिती आवश्यक आहे ते प्रयोजन

(चार) अपिलाची कारणे

ठिकाण : ..............

दिनांक : ..............

अपीलकाराची स्वाक्षरी

**प्रतिज्ञापत्र**

मी, ........................................................................ (अपीलदाराचे नाव), ........................................................ चा मुलगा/ची मुलगी/ची पत्नी, याव्दारे घोषित करीत आहे की, अपिलामध्ये दिलेला तपशील माझ्या संपूर्ण माहितीप्रमाणे व विश्वासाप्रमाणे सत्य व अचूक आहे आणि मी कोणतीही महत्त्वाची वस्तुस्थिती लपवून ठेवलेली नाही.

ठिकाण : ................

दिनांक : ................

अपीलकाराची स्वाक्षरी

प्रति : ........................................................................................................ (अपील प्राधिकाऱ्याचे नाव व पत्ता)

अर्ज ३६५



नमुनापत्र - ड

[ पहा (१९) ]

**माहिती अधिकाऱ्याने ठेवावयाची नोंदवही**

| अनु-क्रमांक (१) | अर्जदाराचे नाव (२) | अर्जाचा दिनांक (३) | माहिती दिलेली आहे किंवा अर्ज नाकारला किंवा कसे, याबाबतचा तपशील (४) | अपील दाखल केले किंवा कसे (५) | शेरा, जर असल्यास (६) |
|---|---|---|---|---|---|
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |
| | | | | | |

**अनुसूची**

[ पहा - (१२) ]

| अ.क्र. (१) | दस्तऐवजाचे वर्णन (२) | रुपयांमध्ये शुल्क (३) |
|---|---|---|
| १ | जेव्हा संबंधित विभागाने काही दस्तऐवज, नकाशा इत्यादींची किंमत अगोदरच निश्चित केली असेल तर, | निश्चित केलेली किंमत + टपाल खर्च (व्यक्तिशः घेणाऱ्यांखेरीज) |
| २ | जेव्हा माहिती, एकतर झेरॉक्स करून, नक्कल करून किंवा इतर मार्गाने (प्रत) चटकन मिळण्याजोगी असेल तर, | प्रति पृष्ठ ०.५० पैसे + टपाल खर्च (व्यक्तिशः घेणाऱ्यांखेरीज) |
| ३ | जर माहिती चटकन मिळण्याजोगी नसेल आणि ती गोळा करण्याची आवश्यकता असेल तर. | प्रति पृष्ठ रु. २ + टपाल खर्च (व्यक्तिशः घेणाऱ्यांखेरीज) |

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

असा. क्र. ४०

रजिस्टर्ड नं. टीईसीएच/४७-३०३/एमबीआय/२००३-०५

जन '३६५

# महाराष्ट्र शासन राजपत्र

असाधारण

प्राधिकृत प्रकाशन

सोमवार, ऑगस्ट ११, २००३/श्रावण २०, शके १९२५

स्वतंत्र संकलन म्हणून फाईल करण्यासाठी या भागाला वेगळे पृष्ठ क्रमांक दिले आहेत.

## भाग चार

महाराष्ट्र विधानमंडळाचे अधिनियम व राज्यपालांनी प्रख्यापित केलेले अध्यादेश व केलेले विनियम

अनुक्रमणिका

| | पृष्ठे |
|---|---|
| सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१.—महाराष्ट्र राज्यात माहितीचा अधिकार परिणामकारक रीतीने प्राप्त करण्यासाठी व त्याची अंमलबजावणी करण्यासाठी आणि तत्संबंधी व तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम. | २८२–२९१ |

दिनांक १० ऑगस्ट २००३ रोजी मा. राष्ट्रपतींनी संमती दिलेला महाराष्ट्र विधानमंडळाचा पुढील अधिनियम माहितीसाठी, याद्वारे, प्रसिद्ध करण्यात येत आहे.

**प्रतिमा उमरजी,**
प्रधान सचिव, महाराष्ट्र शासन,
विधी व न्याय विभाग.

### सन २००३ चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३१.

(मा. राष्ट्रपतींची संमती मिळाल्यानंतर "**महाराष्ट्र शासन राजपत्रात**" दिनांक ११ ऑगस्ट २००३ रोजी प्रथम प्रसिद्ध केलेला अधिनियम.)

**महाराष्ट्र राज्यात माहितीचा अधिकार परिणामकारक रीतीने प्राप्त करण्यासाठी व त्याची अंमलबजावणी करण्यासाठी आणि तत्संबंधी व तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करण्याकरिता अधिनियम.**

**ज्याअर्थी,** भारताचे संविधान याच्या अनुच्छेद १९(१) अन्वये नागरिकांना दिलेल्या मूलभूत अधिकारांचा एक भाग म्हणून सर्वोच्च न्यायालयाने माहितीच्या अधिकारास मान्यता दिलेली आहे ;

**आणि ज्याअर्थी,** माहितीचा अधिकार हा लोकशाहीचा पाया असून त्यामुळे राज्याच्या राजकारभारात पारदर्शकता, खुलेपणा व जबाबदारीची जाणीव आणणे सुलभ होईल आणि लोकशाही समाजव्यवस्थेमध्ये जनतेच्या प्रभावी सहभागाची सुनिश्चिती होईल ;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्यात माहितीचा अधिकार परिणामकारक रीतीने प्राप्त करण्यासाठी व त्याची अंमलबजावणी करण्यासाठी आणि तत्संबंधी किंवा तद्नुषंगिक बाबींसाठी तरतूद करणे इष्ट आहे ;

आणि ज्याअर्थी, राज्य विधानमंडळाच्या दोन्ही सभागृहांचे अधिवेशन चालू नव्हते ;

आणि ज्याअर्थी, श्री. चुनीलाल करसनदास ठक्कर, हे महाराष्ट्राचे राज्यपाल यांची कार्ये पार पाडताना, यात यापुढे दिलेल्या प्रयोजनांसाठी, कायदा करण्याकरिता, त्वरित कार्यवाही करणे जीमुळे आवश्यक व्हावे, अशी परिस्थिती अस्तित्वात असल्याबद्दल त्यांची खात्री पटली होती ; आणि, म्हणून त्यांनी दिनांक २३ सप्टेंबर २००२ रोजी, महाराष्ट्र माहितीचा अधिकार अध्यादेश, २००२ हा प्रख्यापित केला होता ; २००२ चा महा अध्या. १०.

आणि ज्याअर्थी, उक्त अध्यादेशाचे राज्य विधानमंडळाच्या अधिनियमात रूपांतर करणे इष्ट आहे ; त्याअर्थी, भारतीय गणराज्याच्या त्रेपन्नाव्या वर्षी, याद्वारे, पुढील अधिनियम करण्यात येत आहे :—

संक्षिप्त नाव, व्याप्ती व प्रारंभ. १. (१) या अधिनियमास, महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२ असे म्हणावे.

(२) तो, संपूर्ण महाराष्ट्र राज्यास लागू असेल.

(३) तो, दिनांक २३ सप्टेंबर २००२ रोजी अंमलात आला असल्याचे मानण्यात येईल.

व्याख्या. २. या अधिनियमात, संदर्भानुसार अन्य अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(१) " अपील प्राधिकरण " याचा अर्थ, खंड (३) मध्ये नमूद केलेला संबंधित सक्षम प्राधिकारी, असा आहे आणि या अधिनियमाच्या प्रयोजनार्थ, संबंधित सक्षम प्राधिकाऱ्यांनी सर्वसाधारण किंवा विशेष आदेशाद्वारे, अपील प्राधिकारी म्हणून कृती करण्यासाठी प्राधिकृत केलेल्या अशा अधिकाऱ्याचा किंवा अधिकाऱ्यांचादेखील त्यात समावेश असेल ;

(२) " समिती " याचा अर्थ, शासनाचे अपर मुख्य सचिव (गृह) हे अध्यक्षस्थानी असलेली आणि शासनाकडून विनिर्दिष्ट करण्यात आलेले अन्य दोन सदस्य असलेली, कलम ७ (क) च्या प्रयोजनांकरिता, या बाबतीत काढण्यात आलेल्या आदेशाद्वारे शासनाने घटित केलेली समिती, असा आहे ;

(३) " सक्षम प्राधिकारी " याचा अर्थ,—

(एक) राज्य शासनाच्या प्रत्येक प्रशासकीय विभागाचा प्रमुख ;

(दोन) राज्यातील शासकीय व इतर प्राधिकरणांचे प्रशासकीय प्रमुख ;

(तीन) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम, १९६० अन्वये नोंदणी झालेल्या सहकारी संस्थांकरिता, सहकारी संस्थांचे निबंधक ; १९६१ चा महा. २४.

(चार) सोसायटी नोंदणी अधिनियम, १८६० अन्वये नोंदणी झालेल्या सोसायट्यांकरिता सोसायटींचे निबंधक ; १८६० चा २१.

१९५० चा मुंबई २९. (पाच) धर्मादाय आयुक्तांच्या कार्यालयाचे आणि मुंबई सार्वजनिक विश्वस्त व्यवस्था अधिनियम, १९५० अन्वये नोंदणी करण्यात आलेल्या सार्वजनिक विश्वस्त व्यवस्थेकरिता धर्मादाय आयुक्त ;

(सहा) कामगार आयुक्ताकडे नोंदणी झालेल्या श्रमिक संघांकरिता कामगार आयुक्त ;

(सात) महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या प्रशासकीय शाखेकरिता महाराष्ट्र लोकसेवा आयोगाचा सचिव ;

(आठ) लोकायुक्त आणि उप लोकायुक्तांच्या कार्यालयाच्या प्रशासकीय शाखेकरिता लोकायुक्त आणि उप लोकआयुक्तांचे प्रबंधक,

असा आहे ;

(४) " शासन " याचा अर्थ, महाराष्ट्र शासन असा आहे ;

(५) " माहिती " याचा अर्थ, शासनाच्या आणि कोणत्याही शासकीय प्राधिकरणाच्या कारभारासंबंधातील कोणत्याही बाबीविषयीची माहिती, असा आहे आणि त्यात, दस्तऐवज, डिस्केट्स, फ्लॉपी किंवा अन्य कोणत्याही इलेक्ट्रॉनिक प्रकार यामधील कोणत्याही अभिलेखाच्या प्रतीचा समावेश होतो ;

(६) " शासकीय प्राधिकरण " याचा अर्थ, कोणत्याही केंद्रीय किंवा राज्य कायद्याद्वारे स्थापना केलेले किंवा घटित केलेले कोणतेही प्राधिकरण किंवा संस्था, असा आहे आणि त्यात, राज्याची मालकी असलेली व राज्याकडून नियंत्रित केलेली कोणतीही संस्था किंवा ज्या संस्थेला शासनाकडून प्रत्यक्षपणे किंवा अप्रत्यक्षपणे कोणतेही सहाय्य मिळते, अशी इतर कोणतीही संस्था यांचा समावेश होतो आणि त्यात, ज्या संस्थांची रचना व प्रशासन प्रामुख्याने शासनाकडून नियंत्रित केले जाते किंवा अशा ज्या संस्थेची कार्ये सार्वजनिक स्वरूपाची किंवा हिताची आहेत किंवा ज्या संस्थेचे पदाधिकारी शासनाने नियुक्त केलेले आहेत, अशा संस्थांचाही समावेश होईल.

**स्पष्टीकरण.**—या खंडाच्या प्रयोजनार्थ, " सहाय्य " या शब्दप्रयोगामध्ये, सवलतीच्या दराने शासकीय जमिनीच्या स्वरूपातील शासकीय सहाय्य किंवा शासनाकडून दिल्या जाणाऱ्या किंवा वेळोवेळी, विनिर्दिष्ट केल्या जाणाऱ्या, कर इत्यादीपासूनच्या सुट देण्यासारख्या इतर कोणत्याही आर्थिक सवलती, यांचा समावेश होईल ;

(७) " शासकीय माहिती अधिकारी " याचा अर्थ, कलम ५ च्या पोट-कलम (१) अन्वये कोणत्याही सक्षम प्राधिकाऱ्याने पदनिर्देशित केलेला अधिकारी, असा आहे आणि त्यात, या अधिनियमाखाली आपले कर्तव्य पार पाडण्यासाठी शासकीय माहिती अधिकाऱ्याकडून ज्याचे सहाय्य घेतले जाते अशा अधिकाऱ्याचा किंवा कर्मचाऱ्याचा समावेश असेल ;

(८) " विहित " याचा अर्थ, या अधिनियमान्वये करण्यात आलेल्या नियमांद्वारे विहित केलेले, असा आहे ;

(९) " अभिलेख " याचा अर्थ,—

(एक) कोणताही दस्तऐवज, हस्तलिखित किंवा फाईल ,

(दोन) दस्तऐवजाचा कोणताही सूक्ष्मपट (मायक्रोफिल्म), सूक्ष्म चित्रपट्टिका (मायक्रोफिश) आणि प्रतिरूप (फॅक्सिमिल) प्रत ,

(तीन) अशा सूक्ष्मपटामध्ये संनिविष्ट केलेल्या प्रतिमेची किंवा प्रतिमांची कोणतीही पुनर्निर्मिती (मग त्या परिवर्धित केलेल्या असोत वा नसोत) , आणि

(चार) संगणकाद्वारे किंवा अन्य कोणत्याही साधनाद्वारे निर्माण करण्यात आलेले इतर कोणतेही साहित्य,

असा आहे आणि त्यात या सर्वांचा समावेश होतो ;

(१०) " राज्य " याचा अर्थ, महाराष्ट्र राज्य, असा आहे.

**माहितीचा अधिकार.** ३. या अधिनियमाच्या तरतुदींना अधीन राहून प्रत्येक नागरिकाला माहिती मिळवण्याचा अधिकार असेल.

**शासकीय प्राधिकरणावरील बंधने.** ४. प्रत्येक सक्षम प्राधिकारी,—

(क) त्याच्या कामकाजाच्या आवश्यकतेनुसार सुसंगत अशा रीतीने आणि अशा नमुन्यात आपले सर्व अभिलेख रीतसर तालिकाबद्ध व निर्देश सूचीबद्ध करून ठेवील ;

(ख) विहित केलेल्या रीतीने वेळोवेळी,—

(एक) त्याच्या संघटनेचा, कार्याचा आणि कर्तव्यांचा तपशील ,

(दोन) त्याचे अधिकारी आणि कर्मचारी यांचे अधिकार व कर्तव्ये आणि निर्णय घेण्याच्या प्रक्रियेत त्यांनी अनुसरावयाची कार्यपद्धती,

(तीन) त्याची कर्तव्ये पार पाडण्यासाठी शासकीय प्राधिकरणाने ठरवून दिलेली प्रमाणके,

(चार) नागरिकांना उपलब्ध करून देता येतील असे नियम, विनियम, सूचना, नियमपुस्तिका, शासन निर्णय, आदेश व मार्गदर्शिका आणि कार्यालयात असलेल्या अभिलेखांची यादी,

(पाच) माहिती मिळवण्यासाठी नागरिकांना उपलब्ध असलेल्या सुविधांचा तपशील,

(सहा) शासकीय माहिती अधिकाऱ्याचे नाव, पदनाम आणि इतर तपशील, आणि

(सात) संबंधित सक्षम प्राधिकाऱ्याकडून वेळोवेळी विहित करण्यात येईल अशी अतिरिक्त माहिती,

प्रसिद्ध करील ;

(ग) जे निर्णय आणि धोरणे घोषित केल्यावर त्याचा जनतेवर परिणाम होतो अशा महत्त्वाच्या प्रशासकीय किंवा न्यायिकवत निर्णयाशी आणि धोरणांशी संबंधित सर्व प्रस्तुत वस्तुस्थिती प्रसिद्ध करील ;

(घ) कोणताही प्रकल्प सुरू करण्यापूर्वी, जनतेला सर्वसाधारणपणे आणि खास करून प्रकल्पबाधित व्यक्तींना, त्याच्याकडे उपलब्ध असलेली किंवा त्याला सहज प्राप्त असलेली आणि त्या बाधित व्यक्तींना त्यांच्या मते जी कळणे आवश्यक असेल अशी माहिती प्रसिद्ध करील किंवा कळवील.

**शासकीय माहिती अधिकाऱ्यांची नियुक्ती.** ५. (१) प्रत्येक सक्षम प्राधिकारी, या अधिनियमाच्या प्रयोजनासाठी, अशा प्राधिकाऱ्याच्या नियंत्रणाखालील सर्व प्रशासकीय युनिटे आणि कार्यालये यांमध्ये शासकीय माहिती अधिकारी म्हणून एका किंवा अधिक अधिकाऱ्यांना पदनिर्देशित करील.

(२) प्रत्येक शासकीय माहिती अधिकारी, माहितीसाठी केलेल्या विनंतीबाबत कार्यवाही करील आणि अशी माहिती मागणाऱ्या व्यक्तीस वाजवी सहाय्य करील.

(३) शासकीय माहिती अधिकाऱ्यास, त्याची कर्तव्ये उचितपणे बजावण्यासाठी त्यास आवश्यक वाटेल अशा इतर अधिकाऱ्याचे किंवा कर्मचाऱ्याचे सहाय्य घेता येईल.

(४) पोट-कलम (३) अन्वये ज्या कोणत्याही अधिकाऱ्याचे किंवा कर्मचाऱ्याचे सहाय्य मागितले असेल तो, त्याचे सहाय्य मागणाऱ्या शासकीय माहिती अधिकाऱ्यास सर्वतोपरी सहाय्य करील.

माहिती मिळविण्याची कार्यपद्धती.

६. (१) माहिती मिळवण्याची इच्छा असलेली व्यक्ती विहित रीतीने आणि विहित करण्यात येईल अशा शुल्कासह, अशा नमुन्यात आणि अशा तपशीलासह, शासकीय माहिती अधिकाऱ्याकडे अर्ज करील.

(२) पोट-कलम (१) अन्वये माहिती मिळण्याची विनंती करणारा अर्ज मिळाल्यानंतर, शासकीय माहिती अधिकारी, शक्य तितक्या शीघ्रतेने आणि कोणत्याही परिस्थितीत, तो अर्ज मिळाल्याच्या दिनांकापासून पंधरा कामाच्या दिवसांपेक्षा अधिक नसेल एवढ्या कालावधीत, एकतर मागितलेली माहिती पुरवील किंवा या अधिनियमाच्या तरतुदींन्वये विनिर्दिष्ट केलेल्या कोणत्याही कारणांकरिता तो माहितीची मागणी फेटाळील :

परंतु, योग्य प्रकरणामध्ये, ही कालमर्यादा, कारणे नमूद करून आणि अर्जदाराला ती कळवून, आणखी पंधरा कामाच्या दिवसांनी वाढविता येईल :

परंतु आणखी असे की, आवश्यक ती माहिती देण्यासाठीचे मूल्य दर्शविणाऱ्या, विहित फी व्यतिरिक्त कोणत्याही अतिरिक्त फीचे प्रदान केल्यावर एखादी माहिती देण्याचे ठरविण्यात आले असेल त्या बाबतीत, शासकीय माहिती अधिकारी, त्याने निश्चित केलेल्या अतिरिक्त फीचा तपशील देणारी सूचना अर्जदारास पाठवील व अर्जदाराने ती अतिरिक्त फी जमा करावी अशी त्यास विनंती करील आणि उक्त सूचना त्याला पाठवण्यात आल्यापासून ते अशा अतिरिक्त फीचे प्रदान होईपर्यंतचा दरम्यानचा काही कालावधी असल्यास तो, या पोट-कलमामध्ये निर्दिष्ट केलेला पंधरा कामाच्या दिवसांचा कालावधी किंवा, यथास्थिति, जादा पंधरा दिवसांचा कालावधी, मोजण्याच्या प्रयोजनार्थ वगळण्यात येईल :

परंतु तसेच, विहित फी, किंवा यथास्थिति, देय असलेली अतिरिक्त फी ही, माहिती पुरविण्याच्या प्रत्यक्ष खर्चापेक्षा अधिक असणार नाही.

(३) पोट-कलम (२) अन्वये जेव्हा एखादी मागणी फेटाळण्यात येईल तेव्हा त्या बाबतीत, शासकीय माहिती अधिकारी, मागणी करणाऱ्या व्यक्तीस,—

(एक) मागणी फेटाळण्यामागील कारणे ;

(दोन) मागणी फेटाळण्याविरुद्ध ज्या कालावधीत अपील दाखल करता येईल, तो कालावधी ; आणि

(तीन) ज्याच्याकडे अर्जदाराने अपील दाखल करावयाचे तो अधिकारी किंवा प्राधिकारी, या गोष्टी लेखी कळवील.

(४) शासकीय प्राधिकरणाने ज्या भाषेमध्ये व ज्या नमुन्यामध्ये माहिती ठेवली असेल, त्या भाषेमध्ये व त्या नमुन्यामध्ये माहिती देण्यात येईल.

(५) जेव्हा जेव्हा व जेथे जेथे, मागणी केलेली माहिती ही, एखाद्या व्यक्तीचे जीवन व स्वातंत्र्य यांच्याशी संबंधित असेल तेव्हा तेव्हा व तेथे तेथे, ती माहिती, कलम ७ च्या तरतुदींना अधीन राहून, अर्ज मिळाल्यापासून चोवीस तासांच्या आत त्या अर्जदारास पुरविण्यात येईल.

माहिती उघड करण्यातून सूट.

७. या अधिनियमामध्ये काहीही अंतर्भूत असले तरी, कोणत्याही व्यक्तीस,—

(क) जी माहिती उघड करण्याने भारताचे सार्वभौमत्व व एकात्मता, राज्याची सुरक्षितता किंवा हित, विदेशी राज्याशी असलेले संबंध यांवर बाधकरित्या परिणामक होईल किंवा एखाद्या अपराधास चिथावणी मिळेल, अशी माहिती देण्यात येणार नाही :

परंतु, जेव्हा जेव्हा मागितलेली कोणतीही माहिती वर नमूद केलेल्या कारणांसाठी रोखून ठेवावयाची असेल तेव्हा तेव्हा, अशा माहितीसाठी करण्यात आलेली विनंती, शासकीय माहिती अधिकारी, सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत ताबडतोब समितीपुढे विचारार्थ आणि निर्णयार्थ मांडील :

परंतु, आणखी असे की, शासकीय माहिती अधिकारी, ती विनंती नाकारण्यासाठी अशा समितीकडून मान्यता मिळवल्यावर, असा नकार अर्जदाराला कळविताना, समितीच्या मान्यतेने असा नकार देण्यात आला आहे, हे नमूद करील ;

(ख) जी माहिती प्रसिद्ध करण्यास कोणत्याही न्यायालयाकडून किंवा न्यायाधिकरणाकडून स्पष्टपणे मनाई करण्यात आली असेल किंवा जी उघड करण्याने न्यायालयाचा अवमान होत असेल, अशी माहिती देण्यात येणार नाही ;

(ग) जी माहिती उघड करण्याने, संसदेच्या अथवा राज्य विधानमंडळाच्या विशेषाधिकारांचा भंग होत असेल, अशी माहिती देण्यात येणार नाही ;

(घ) वाणिज्य क्षेत्रातील विश्वास, व्यापारविषयक गुपिते किंवा बौद्धिक संपदा यांसारखी जी माहिती, उघड करण्याने त्रयस्थ पक्षाच्या स्पर्धात्मक स्थानाला हानी पोहोचेल ती माहिती उघड केल्याने अधिकाधिक लोकहिताची हमी मिळेल, अशी सक्षम प्राधिकाऱ्याची खात्री पटलेली असल्याखेरीज, अशी माहिती देण्यात येणार नाही ;

(ङ) एखाद्या व्यक्तीच्या विश्वासाश्रित संबंधामुळे त्याला उपलब्ध झालेली माहिती— जी माहिती उघड केल्याने अधिकाधिक लोकहिताची हमी मिळेल, अशी सक्षम प्राधिकाऱ्याची खात्री पटलेली असल्याखेरीज—देण्यात येणार नाही ;

(च) एखाद्या व्यक्तीच्या सेवा अभिलेखाशी संबंधित असलेली माहिती देण्यात येणार नाही ;

(छ) विदेशी सरकार किंवा आंतरराष्ट्रीय संघटना यांच्याकडून गुप्तपणे मिळालेली माहिती देण्यात येणार नाही ;

(ज) जी माहिती उघड करण्याने, कोणत्याही व्यक्तीचे जीवन किंवा शारीरिक सुरक्षितता धोक्यात येईल अथवा कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी किंवा सुरक्षिततेच्या प्रयोजनांसाठी गुप्तपणे दिलेल्या माहितीचे सूत्र किंवा केलेले सहाय्य ओळखता येईल, अशी माहिती देण्यात येणार नाही ;

(झ) शासकीय गुपिते अधिनियम, १९२३ च्या तरतुदीन्वये जी उघड करण्यास मनाई केली आहे, अशी माहिती देण्यात येणार नाही ; १९२३ चा १९.

(ञ) ज्यामुळे गुन्हेगारांचे अन्वेषण करणे किंवा त्यांना अटक करणे किंवा त्यांच्यावर खटला दाखल करणे यामध्ये अडथळा येईल, अशी माहिती देण्यात येणार नाही ; आणि

(ट) जी माहिती उघड करण्याचा कोणत्याही सार्वजनिक कामकाजाशी किंवा हितसंबंधाशी कोणताही संबंध नसेल किंवा जी उघड केल्याने व्यक्तीच्या खाजगीपणाचे विनाकारण उल्लंघन होईल अशी वैयक्तिक माहितीशी संबंधित असलेली माहिती, व्यापक लोकहिताच्या दृष्टीने ती उघड करणे आवश्यक आहे, अशी सक्षम प्राधिकाऱ्याची खात्री पटलेली असल्याखेरीज देण्यात येणार नाही.

**विवक्षित प्रकरणांमध्ये माहिती देण्यास नकार देण्याची कारणे.**

८. कलम ७ च्या तरतुदींना बाध न येता, शासकीय माहिती अधिकाऱ्यास पुढील बाबतीत माहिती पुरविण्याच्या विनंतीस, नकार देता येईल :—

(क) जेव्हा माहिती ही आधीच राजपत्रात किंवा अन्यत्र प्रसिद्ध झालेली असून ती जनतेला उपलब्ध आहे किंवा ती अशा स्वरूपाची आहे की परत मिळविणे किंवा संस्करण करणे आवश्यक असलेल्या त्या मोठ्या प्रमाणातील माहितीसाठी शासकीय प्राधिकरणाच्या साधनसामग्रीचा प्रमाणाबाहेर वापर करावा लागेल :

परंतु, जेव्हा जेव्हा मागितलेली कोणतीही माहिती वर नमूद केलेल्या कारणांसाठी रोखून ठेवावयाची असेल तेव्हा तेव्हा, अशा माहितीसाठी करण्यात आलेली विनंती, शासकीय माहिती अधिकारी, सक्षम प्राधिकाऱ्यामार्फत ताबडतोब समितीपुढे विचारार्थ आणि निर्णयार्थ मांडील :

परंतु, आणखी असे की, शासकीय माहिती अधिकारी, ती विनंती नाकारण्यासाठी अशा समितीकडून मान्यता मिळवल्यावर, असा नकार अर्जदाराला कळविताना, समितीच्या मान्यतेने असा नकार देण्यात आला आहे, हे नमूद करील ;

(ख) जी माहिती प्रसिद्ध करण्यास कोणत्याही न्यायालयाकडून किंवा न्यायाधिकरणाकडून स्पष्टपणे मनाई करण्यात आली असेल किंवा जी उघड करण्याने न्यायालयाचा अवमान होत असेल, अशी माहिती देण्यात येणार नाही ;

(ग) जी माहिती उघड करण्याने, संसदेच्या अथवा राज्य विधानमंडळाच्या विशेषाधिकारांचा भंग होत असेल, अशी माहिती देण्यात येणार नाही ;

(घ) वाणिज्य क्षेत्रातील विश्वास, व्यापारविषयक गुपिते किंवा बौद्धिक संपदा यांसारखी जी माहिती, उघड करण्याने त्रयस्थ पक्षाच्या स्पर्धात्मक स्थानाला हानी पोहोचेल ती माहिती उघड केल्याने अधिकाधिक लोकहिताची हमी मिळेल, अशी सक्षम प्राधिकाऱ्याची खात्री पटलेली असल्याखेरीज, अशी माहिती देण्यात येणार नाही ;

(ङ) एखाद्या व्यक्तीच्या विश्वासाश्रित संबंधामुळे त्याला उपलब्ध झालेली माहिती—जी माहिती उघड केल्याने अधिकाधिक लोकहिताची हमी मिळेल, अशी सक्षम प्राधिकाऱ्याची खात्री पटलेली असल्याखेरीज—देण्यात येणार नाही ;

(च) एखाद्या व्यक्तीच्या सेवा अभिलेखाशी संबंधित असलेली माहिती देण्यात येणार नाही ;

(छ) विदेशी सरकार किंवा आंतरराष्ट्रीय संघटना यांच्याकडून गुप्तपणे मिळालेली माहिती देण्यात येणार नाही ;

(ज) जी माहिती उघड करण्याने, कोणत्याही व्यक्तीचे जीवन किंवा शारीरिक सुरक्षितता धोक्यात येईल अथवा कायद्याची अंमलबजावणी करण्यासाठी किंवा सुरक्षिततेच्या प्रयोजनांसाठी गुप्तपणे दिलेल्या माहितीचे सूत्र किंवा केलेले सहाय्य ओळखता येईल, अशी माहिती देण्यात येणार नाही ;

(झ) शासकीय गुपिते अधिनियम, १९२३ च्या तरतुदीन्वये जी उघड करण्यास मनाई केली आहे, अशी माहिती देण्यात येणार नाही ; १९२३ चा १९.

(ञ) ज्यामुळे गुन्हेगारांचे अन्वेषण करणे किंवा त्यांना अटक करणे किंवा त्यांच्यावर खटला दाखल करणे यामध्ये अडथळा येईल, अशी माहिती देण्यात येणार नाही ; आणि

(ट) जी माहिती उघड करण्याचा कोणत्याही सार्वजनिक कामकाजाशी किंवा हितसंबंधाशी कोणताही संबंध नसेल किंवा जी उघड केल्याने व्यक्तीच्या खाजगीपणाचे विनाकारण उल्लंघन होईल अशी वैयक्तिक माहितीशी संबंधित असलेली माहिती, व्यापक लोकहिताच्या दृष्टीने ती उघड करणे आवश्यक आहे, अशी सक्षम प्राधिकाऱ्याची खात्री पटलेली असल्याखेरीज देण्यात येणार नाही.

**विवक्षित प्रकरणांमध्ये माहिती देण्यास नकार देण्याची कारणे.**

८. कलम ७ च्या तरतुदींना बाध न येता, शासकीय माहिती अधिकाऱ्यास पुढील बाबतीत माहिती पुरविण्याच्या विनंतीस, नकार देता येईल :—

(क) जेव्हा माहिती ही आधीच राजपत्रात किंवा अन्यत्र प्रसिद्ध झालेली असून ती जनतेला उपलब्ध आहे किंवा ती अशा स्वरूपाची आहे की परत मिळविणे किंवा संस्करण करणे आवश्यक असलेल्या त्या मोठ्या प्रमाणातील माहितीसाठी शासकीय प्राधिकरणाच्या साधनसामग्रीचा प्रमाणाबाहेर वापर करावा लागेल :

परंतु, उपरोक्त कारणावरून जेव्हा अशी विनंती नाकारली असेल तेव्हा, माहिती मागणाऱ्या व्यक्तीला, ज्यायोगे माहितीचा पुरवठा करणे सुकर होईल अशा रीतीने ती विनंती पुन्हा सादर करण्यास शक्य होईल तितकी मदत करणे हे शासकीय माहिती अधिकाऱ्याचे कर्तव्य असेल ;

(ख) जेव्हा ती माहिती अशा माहितीशी संबंधित असेल की, जी कायदा, नियम, विनियम किंवा आदेश यांद्वारे विशिष्ट वेळी प्रसिद्ध करणे आवश्यक असेल.

९. (१) कलम ७ च्या तरतुदींना बाध न येता,— इतर माहिती.

(क) एखाद्या प्रकरणात निर्णय प्रक्रियेशी संबंधित असलेली माहिती, कोणत्याही अर्जदारास, अशा प्रकरणी निर्णय घेण्यात आल्यानंतर किंवा निर्णय घेतला असल्याचे मानण्यात आल्यानंतर आणि ते प्रकरण पूर्ण झाल्यावर किंवा समाप्त झाल्यावर, उपलब्ध करून देण्यात येईल ;

(ख) कलम ६ च्या पोट-कलम (१) खाली केलेल्या कोणत्याही विनंतीच्या दिनांकापूर्वीच्या पंधरा वर्षांपूर्वी झाली असेल, उद्भवली असेल, घडली असेल अशी कोणतीही घटना, प्रसंग किंवा बाब या संबंधातील कोणतीही माहिती अशी विनंती करणाऱ्या कोणत्याही व्यक्तीस पुरविण्यात येईल.

(२) संसदेपासून किंवा राज्य विधानमंडळापासून जी रोखून ठेवता येत नसेल अशी कोणतीही माहिती, या अधिनियमाच्या तरतुदींखाली अर्जदारास अवश्य उपलब्ध करून दिली जाईल.

१०. ज्या माहितीसाठी एखादी विनंती करण्यात आली असेल ती माहिती, जर या अधिनियमान्वये उघड करण्यापासून सूट दिली आहे अशा माहितीचा समावेश नसलेल्या अभिलेखाच्या भागामधून देणे शक्य असेल किंवा ती माहिती जर, सूट दिलेल्या माहितीचा समावेश असलेल्या अभिलेखाच्या कोणत्याही भागापासून वाजवी रीत्या पृथक करता येण्याजोगी असेल तर, ती माहिती उघड करण्यापासून सूट दिलेल्या एखाद्या माहितीशी किंवा अभिलेखाशी संबंधित आहे, या कारणावरून ती विनंती पूर्णपणे नाकारता येणार नाही. पृथक्करण योग्यता.

११. (१) (एक) शासकीय माहिती अधिकाऱ्याच्या आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, असा आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत ; किंवा अपिलं.

(दोन) ज्या व्यक्तीला, कलम ६ च्या पोट-कलम (२) मध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे असा अर्ज केल्याच्या दिनांकापासून, पंधरा कामाच्या दिवसांच्या कालावधीच्या आत किंवा उक्त पोट-कलम (२) च्या दुसऱ्या परंतुकामध्ये विनिर्दिष्ट केल्याप्रमाणे वाढीव कालावधीच्या आत, काही कळविण्यात आले नसेल अशा कोणत्याही व्यक्तीस,

असा कालावधी व्यपगत झाल्यापासून, तीस दिवसांच्या कालावधीच्या आत, विहित करण्यात येईल अशा नमुन्यात व अशा फीसह अपील प्राधिकरणाकडे अपील करता येईल :

परंतु, जेव्हा कलम ७ च्या खंड (क) अन्वये शासकीय माहिती अधिकारी उक्त खंड (क) च्या परंतुकामध्ये निर्देशिलेल्या समितीच्या मान्यतेने, आदेश काढील, तेव्हा, अशा आदेशा-विरुद्धचे अपील फक्त लोकायुक्ताकडे किंवा उप लोकायुक्तांकडेच दाखल केले जाईल.

(२) अपील प्राधिकरणास, बाधित झालेल्या व्यक्तीस किंवा व्यक्तींना आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, त्यास योग्य वाटेल असा आदेश देता येईल.

(३) अपील प्राधिकरणाच्या पोट-कलम (२) खालील आदेशामुळे व्यथित झालेल्या कोणत्याही व्यक्तीस, असा आदेश मिळाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत, राज्याच्या लोकायुक्ताकडे, किंवा यथास्थिति, उप लोकायुक्ताकडे, दुसरे अपील दाखल करता येईल.

(४) पोट-कलमे (१) आणि (३) मध्ये निर्देशिलेली अपिले, अशी अपिले मिळाल्याच्या दिनांकापासून तीस दिवसांच्या आत किंवा तीस दिवसांपेक्षा आणखी अधिक होणार नाही अशा वाढविलेल्या कालावधीच्या आत, कालावधी अशाप्रकारे वाढविल्याची कारणे नमूद करून, शक्यतोवर निकालात काढण्यात येतील.

(५) लोकायुक्त किंवा, यथास्थिति, उप लोकायुक्तांचा अपिलांवरील निर्णय अंतिम असेल.

शास्ती. **१२.** (१) जेव्हा कोणत्याही शासकीय माहिती अधिकाऱ्याने कलम ६ च्या पोट-कलम (२) अन्वये विनिर्दिष्ट केलेल्या कालावधीच्या आत, मागितलेली माहिती देण्यात कोणत्याही योग्य कारणाशिवाय कसूर केली असेल तेव्हा, अपील प्राधिकरणास अशा अपिलामध्ये, शासकीय माहिती अधिकाऱ्याला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, माहिती देण्यास विलंब केल्याच्या प्रत्येक दिवसाकरिता दोनशे पन्नास रुपये एवढ्या रकमेची शास्ती लादता येईल.

(२) कोणत्याही शासकीय माहिती अधिकाऱ्याने, जाणूनबुजून,—

(क) चुकीची किंवा दिशाभूल करणारी माहिती, किंवा

(ख) सदोष किंवा अपूर्ण माहिती,

दिली असल्याचे अपिलामध्ये आढळून आले असेल तेथे, अपील प्राधिकरणास, शासकीय माहिती अधिकाऱ्याला आपले म्हणणे मांडण्याची वाजवी संधी दिल्यानंतर, त्याला योग्य वाटेल त्यानुसार, अशा अधिकाऱ्यावर दोन हजार रुपयांपेक्षा अधिक नसेल एवढी शास्ती लादता येईल.

(३) अपील प्राधिकरणाच्या आदेशाविरुद्ध, लोकायुक्त किंवा उप लोकायुक्त यांच्याकडे अपील करता येईल आणि कलम ११ ची पोट-कलमे (३), (४) व (५) यांच्या तरतुदी, अशा अपिलास, योग्य त्या फेरफारांसह, लागू होतील.

(४) अपील प्राधिकरणाने, पोट-कलमे (१) व (२) यांअन्वये लादलेली शास्ती, संबंधित शासकीय माहिती अधिकाऱ्याच्या वेतनातून वसुलीयोग्य असेल, किंवा वेतन काढण्यात येत नसेल तर ती, जमीन महसुलाच्या थकबाकीप्रमाणे वसुलीयोग्य असेल.

(५) ज्या शासकीय अधिकाऱ्यावर, पोट-कलमे (१) व (२) यांअन्वये शास्ती लादलेली आहे अशा अधिकाऱ्यावर, त्याला लागू असलेल्या सेवेच्या नियमांन्वये योग्य ती शिस्तभंगाची कारवाई केली जाण्यास देखील तो पात्र असेल.

परिषद घटित करणे. **१३.** (१) शासन, या अधिनियमाच्या कामकाजाचे संनियंत्रण करण्यासाठी राज्य स्तरावर मुख्य सचिवाच्या किंवा कोणत्याही अपर मुख्य सचिवाच्या अध्यक्षतेखाली, आणि प्रत्येक महसुली विभागासाठी संबंधित विभागीय आयुक्ताच्या अध्यक्षतेखाली, एक परिषद स्थापन करील. अशा परिषदेमध्ये सर्वसाधारणपणे, विहित करण्यात येतील त्याप्रमाणे समाजातील नामवंत व प्रतिष्ठित व्यक्ती आणि प्रसारमाध्यमे व अशासकीय संघटना यांचे प्रतिनिधी व शिक्षण तज्ज्ञ, यांचा समावेश असेल.

(२) परिषद, सहा महिन्यांतून किमान एकदा अधिनियमाच्या कामाचा आढावा घेईल आणि शासनाला यथोचित शिफारशी करील.

अभिलेख आयोग घटित करणे. **१४.** (१) शासन, शासनाचे प्रतिनिधी, विहित करण्यात येतील अशा समाजातील नामवंत व प्रतिष्ठित व्यक्ती आणि शिक्षण तज्ज्ञ यांचा मिळून बनलेला अभिलेख आयोग स्थापन करील. जुने अभिलेख, जनतेच्या माहितीकरिता उपलब्ध करून देण्यासाठी खुले करण्याबाबत शासनाला सल्ला देणे, हे अभिलेख आयोगाचे कर्तव्य असेल.

(२) अभिलेख आयोगाचा निर्णय शासनावर बंधनकारक असेल आणि शासनाने कारणे नमूद करून आयोगाचा निर्णय अमान्य करण्याचे ठरवलेले नसल्यास, तीन महिन्यांच्या आत त्या निर्णयाची अंमलबजावणी करण्यात येईल.

(३) अभिलेख आयोगाचा निर्णय अमान्य करण्यात आल्याच्या प्रत्येक प्रकरणी, शासन राज्य विधानमंडळाला लवकरात लवकर तसे निवेदन सादर करील.

१५. या अधिनियमाच्या किंवा त्याखाली केलेल्या नियमांच्या तरतुदींनुसार सद्‌भावनेने केलेल्या किंवा करण्याचे अभिप्रेत असलेल्या कोणत्याही गोष्टीसाठी, कोणताही शासकीय कर्मचारी किंवा अधिकारी यांच्याविरुद्ध कोणताही दावा, खटला किंवा इतर कायदेशीर कार्यवाही दाखल करण्यात येणार नाही. सद्‌भावनेने केलेल्या कृतींना संरक्षण.

१६. कोणतेही न्यायालय, या अधिनियमान्वये दिलेल्या कोणत्याही आदेशाच्या संबंधातील कोणताही दावा, अर्ज किंवा अन्य कार्यवाही दाखल करून घेणार नाही आणि या अधिनियमान्वये करण्यात येणारे अपील वगळता, अशा आदेशास आव्हान देता येणार नाही. न्यायालयांच्या अधिकारितेस रोध.

१७. राज्य विधानमंडळाने तयार केलेल्या कोणत्याही अन्य कायद्यात किंवा त्याखाली केलेल्या कोणत्याही नियमांत, विनियमांत किंवा आदेशात या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत असे काहीही असले तरी, या तरतुदी परिणामक्षम असतील. अधिनियमाचा अधिभावी परिणाम असणे.

१८. (१) या अधिनियमाची प्रयोजने पार पाडण्यासाठी, राज्य शासनास, राजपत्रातील अधिसूचनेद्वारे, नियम करता येतील. नियम करण्याचा अधिकार.

(२) प्रथमच तयार करण्यात आलेल्या नियमांखेरीज, या अधिनियमान्वये तयार केलेले सर्व नियम, पूर्व प्रसिद्धीच्या शर्तीस अधीन असतील.

(३) या अधिनियमान्वये करण्यात आलेला प्रत्येक नियम, तो करण्यात आल्यानंतर शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाचे अधिवेशन चालू असताना, एकाच अधिवेशनात किंवा लागोपाठच्या दोन किंवा त्याहून अधिक अधिवेशनांत, मिळून एकूण तीस दिवसांची होईल इतक्या मुदतीकरिता, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल आणि ज्यामध्ये अशा प्रकारे तो ठेवण्यात येईल ते अधिवेशन किंवा त्या अधिवेशनाच्या लगतनंतरचे अधिवेशन, समाप्त होण्यापूर्वी, त्या नियमात कोणताही फेरबदल करण्यास दोन्ही सभागृहे कबूल होतील किंवा तो नियम करण्यात येऊ नये याबाबत दोन्ही सभागृहांचे एकमत होईल आणि तशा अर्थाचा त्यांचा निर्णय ते राजपत्रात अधिसूचित करतील तर, असा निर्णय राजपत्रात प्रसिद्ध झाल्याच्या दिनांकापासून तो नियम अशा फेरबदल केलेल्या स्वरूपातच अंमलात येईल, किंवा यथास्थिति, मुळीच अंमलात येणार नाही ; तथापि, असा कोणताही फेरबदल किंवा विलोपन यामुळे त्या नियमान्वये पूर्वी करण्यात आलेल्या किंवा करण्याचे वर्जिलेल्या कोणत्याही गोष्टींच्या विधिग्राह्यतेस बाध येणार नाही.

१९. (१) या अधिनियमाच्या तरतुदींची अंमलबजावणी करताना कोणतीही अडचण उद्‌भवल्यास, शासनास, प्रसंगानुरूप अडचण दूर करण्याच्या प्रयोजनासाठी त्यास आवश्यक व इष्ट वाटेल अशी, या अधिनियमाच्या तरतुदींशी विसंगत नसलेली कोणतीही गोष्ट, राजपत्रात प्रसिद्ध केलेल्या आदेशाद्वारे करता येईल : अडचणी दूर करण्याचा अधिकार.

परंतु, या अधिनियमाच्या प्रारंभाच्या दिनांकापासून दोन वर्षांचा कालावधी समाप्त झाल्यावर असा कोणताही आदेश काढता येणार नाही.

(२) या कलमान्वये काढण्यात आलेला प्रत्येक आदेश, तो काढण्यात आल्यानंतर, शक्य तितक्या लवकर, राज्य विधानमंडळाच्या प्रत्येक सभागृहापुढे ठेवण्यात येईल.

सन २००० चा महाराष्ट्र अधिनियम क्रमांक ३८ याचे निरसन.

२०. महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००० हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे. २००० चा महा. ३८.

सन २००० चा महाराष्ट्र अध्यादेश क्रमांक १० याचे निरसन व व्यावृत्ती.

२१. (१) महाराष्ट्र माहितीचा अधिकार अध्यादेश, २००२ हा याद्वारे निरसित करण्यात येत आहे. २००० चा महा. अध्या. १०.

(२) अशा प्रकारे निरसन झाले असले तरीही, उक्त अध्यादेशान्वये करण्यात आलेली कोणतीही गोष्ट किंवा कारवाई ही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा आदेश यांसह) या अधिनियमान्वये करण्यात आलेली गोष्ट, कार्यवाही किंवा यथास्थिती, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा आदेश असल्याचे मानण्यात येईल.

शासकीय मध्यवर्ती मुद्रणालय, मुंबई

(35) १८

जन -३६५



# महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२

**महाराष्ट्र शासन,**
**सामान्य प्रशासन विभाग,**
**शासन परिपत्रक क्रमांक ममाअ-२००२/प्र.क्र.१२७/०२/५**
**मंत्रालय, मुंबई - ४०० ०३२**
**दिनांक : १४ ऑगस्ट, २००३**

पहा : १) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. ममाअ-२००२/प्र.क्र.९६/०२/५ दि. ३०.९.२००२.
२) सामान्य प्रशासन विभाग, शासन परिपत्रक क्र. ममाअ-२००२/प्र.क्र.१३२/०२/५ दि. ७.१.२००३.
३) सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्र. ममाअ-२००३/प्र.क्र.५२/०२/५ दि. ३१.७.२००३.
४) प्रधान सचिव व विशेष चौकशी अधिकारी (१), सामान्य प्रशासन विभाग यांचे मंत्रालयातील सर्व प्रशासकीय विभागांच्या सचिव/प्रधान सचिव/अपर मुख्य सचिवांना उद्देशून पाठविलेले अ.शा.पत्र क्र. ममाअ-२००३/२०६/प्र.क्र.१३/०३/५ दि. ७ जुलै, २००३.

शासन परिपत्रक :

शासकीय व्यवहारांची/कामकाजाची जास्तीत जास्त माहिती जनतेस मिळावी याकरिता दि.२३ सप्टेंबर, २००२ पासून अंमलात आलेल्या "महाराष्ट्र माहितीचा अधिकार अध्यादेश, २००२" च्या अनुषंगाने करावयाच्या कार्यवाहीची सविस्तर कार्यपध्दती उपरोक्त दि.३० सप्टेंबर, २००२ व दि. ७ जानेवारी, २००३ च्या शासन परिपत्रकान्वये सर्व संबंधितांना कळविण्यात आली आहे.

२. दिनांक २३ सप्टेंबर, २००२ रोजी प्रख्यापित केलेला "महाराष्ट्र माहितीचा अधिकार अध्यादेश, २००२" हा अध्यादेश त्याचे विहित मुदतीत अधिनियमात रुपांतर होऊ शकले नसल्याने व्यपगत झाला.

३. या अध्यादेशाचे अधिनियमात रुपांतर करण्याबाबतचे प्रलंबित असलेले "महाराष्ट्र माहितीचा अधिकार विधेयक, २००२" हे विधेयक सन २००३ च्या अर्थसंकल्पीय अधिवेशनात विधी मंडळाच्या दोन्ही सभागृहात मांडण्यात आले होते व ते मंजूरही झाले होते. परंतु त्याची प्रत्यक्ष अंमलबजावणी सुरु होण्यापूर्वी त्यास मा.राष्ट्रपतींची मंजुरी घेणे आवश्यक होते. त्याबाबतची आवश्यक ती कार्यवाही आता पूर्ण होऊन राज्य शासनाच्या विधेयकास मा.राष्ट्रपतींची मंजुरी मिळाली आहे. त्यामुळे या विधेयकाचे अधिनियमात रुपांतर होऊन "महाराष्ट्र माहितीचा अधिकार अधिनियम, २००२" दि.२३.९.२००२ पासून पूर्वलक्षी प्रभावाने अंमलात आलेला आहे. या अधिनियमाची मराठी व इंग्रजी प्रत सोबत जोडली आहे. या अधिनियमातील कलम २१ (१) अनुसार "महाराष्ट्र माहितीचा अधिकार अध्यादेश, २००२" हा निरसित करण्यात आला आहे. तसेच या अध्यादेशान्वये करण्यात आलेली कोणतीही गोष्ट किंवा कार्यवाही ही (काढण्यात आलेली कोणतीही अधिसूचना किंवा आदेश यांसह) सदर अधिनियमांन्वये करण्यात आलेली गोष्ट, कार्यवाही किंवा यथास्थिती, काढण्यात आलेली अधिसूचना किंवा आदेश असल्याचे मानण्यात येईल

प्रति,

१) राज्यपालांचे सचिव,
२) मुख्यमंत्र्यांचे प्रधान सचिव,
३) उपमुख्यमंत्र्यांचे सचिव,
४) सर्व मंत्री/राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव,
५) मुख्य सचिव,
६) शासनाचे सर्व अपर मुख्य सचिव/प्रधान सचिव/सचिव,
* ७) प्रबंधक, उच्च न्यायालय, मूळ न्यायशाखा, मुंबई,
* ८) प्रबंधक, उच्च न्यायालय, अपील शाखा, मुंबई,
* ९) प्रबंधक, महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण, मुंबई
* १०) प्रबंधक, लोकायुक्त व उपलोकायुक्त, मुंबई,
* ११) सचिव, महाराष्ट्र लोकसेवा आयोग, मुंबई
* १२) सचिव, महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन मुंबई,
* १३) सचिव, राज्य निवडणूक आयोग, मुंबई
१४) सर्व विभागीय आयुक्त,
१५) सर्व जिल्हाधिकारी/जिल्हा परिषदांचे मुख्य कार्यकारी अधिकारी,
१६) सर्व मंत्रालयीन विभाग,
१७) मंत्रालयीन विभागाच्या अधिपत्याखालील सर्व विभाग/कार्यालय प्रमुख,
१८) सामान्य प्रशासन विभागातील सर्व कार्यासने,
१९) निवड नस्ती.

* (पत्राने)

—x—